## राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २८/१०/२०२२ अखेरचा खरीप व रब्बी हंगाम २०२२-२३ चा साप्ताहिक अहवाल.

❖ **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश कोरडे होते. कोंकण, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम तर नाशिक व अमरावती विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **खरीप हंगाम २०२२-२३ :**

❖ **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र १४२.८८ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर १४३.१० लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) अंतिम पेरणी झाली आहे. मागील वर्षी दि.२०.०९.२०२१ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील पेरणी क्षेत्र १४२.७० लाख हे. (सरासरीशी १००%) होते.

- भात पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी काढणी सुरु आहे.
- बाजरी पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- नाचणी पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.
- तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- भुईमूग पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.
- सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.
- कापूस पिक बोंडे लागणे ते बोंडे पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी वेचणीस सुरुवात झाली आहे
- राज्यात ऑक्टोंबर महिन्यात काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे काढणीस तयार असलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे पिकांच्या उत्पादनात घट संभवते.

❖ **रब्बी हंगाम-२०२२-२३ :**

❖ **पिक परिस्थिती :**

राज्यात रब्बी पिकांचे सरासरी क्षेत्र ५४.२९ लाख हेक्टर असून दि.२८ ऑक्टोंबर, २०२२ अखेर २.४० लाख हेक्टर क्षेत्रावर (४.४%) पेरणी झाली आहे. मागील वर्षी दि.२५.१०.२०२१ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील पेरणी क्षेत्र १.५८ लाख हे. (सरासरीशी २.९%) होते.

- रब्बी हंगामाच्या लागवडीकरीता पुर्वमशागतीची व पेरणीची कामे सुरु झाली आहेत.
- नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद व लातूर विभागात काही प्रमाणात ज्वारी, मका, हरभरा पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.

**पर्जन्यमान (२०२२)**

दि.१ जून ते २८ ऑक्टोंबर, २०२२ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस १०६८.४ मि.मी. असून दि.२८ ऑक्टोंबर, २०२२ पर्यंत १२८७.९ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १२०.५ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२८.१०.२०२१ अखेर १२६८.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११८.८ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.२८ ऑक्टोंबर, २०२२ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ० | --- |
| ४ | ७५ ते १०० % | ५ | रायगड, रत्नागिरी, नंदुरबार, कोल्हापूर, परभणी. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २९ | ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, नांदेड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली. |

राज्यात दि.२८ ऑक्टोंबर, २०२२ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ३ तालूक्यात ५० ते ७५ %, ४७ तालूक्यात ७५ ते १००% तर ३०५ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **नैसर्गिक आपत्ती :**

दि.२६ ऑक्टोंबर, २०२२ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे ऑक्टोंबर-२०२२ मध्ये २२ जिल्हयात ७,५३,३३३ हे. पिकांचे क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत झाले आहे. तसेच पावसामुळे ४५९ हे. क्षेत्रावरील जमीन खरवडून गेल्यामुळे नुकसान झाले. यामध्ये शेतीपिके, फळपिके व भाजीपाला पिकांचा समावेश आहे.

❖ **किड व रोग :**

राज्यात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा व बोंड सड रोगाचा, भात पिकावर पिवळया खोडकिडीचा, तूर पिकावर मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.

किडरोग व्यवस्थापनासाठी क्षेत्रिय स्तरावर शेतीशाळा, कृषि विद्यापीठांकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा तसेच जैविक किटकनाशकांच्या वापराबाबत सूचना इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच त्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

## खरीप हंगाम सन-२०२२-२३ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी

(दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर)



## खरीप हंगाम सन-२०२२-२३ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर)




## रब्बी हंगाम सन-२०२२-२३ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी

(दि.२८ ऑक्टोंबर, २०२२ अखेर)



# रब्बी हंगाम सन-२०२२-२३ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.२८ ऑक्टोंबर, २०२२ अखेर)




## विभाग निहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१७ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ४.१५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) अंतिम पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**

  - भात पिक पक्वतेच्या अवस्थेत असून कापणीस सुरुवात झाली आहे.
  - नाचणी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे.
  - मूग, उडीद पिके शेंगा पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
  - भुईमूग पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.
  - परतीच्या पावसामुळे काही ठिकाणी शेत पिकांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहे.

- **किड व रोग : निरंक.**
- **रब्बी हंगाम : २०२२-२३**

  - विभागात रब्बी हंगामाच्या पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत. पावसामुळे काही ठिकाणी अडथळा निर्माण झाला आहे.

### नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.०१ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर २०.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) अंतिम पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- भात पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीस सुरुवात झाली आहे.
- नागली पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- ज्वारी पिक दाणे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- मका पिक पक्वतेच्या असून काढणीची कामे सुरु आहेत.
- तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिकांची काढणीची कामे पूर्ण झाली आहेत.
- सुर्यफुल पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत काढणीस सुरुवात झाली आहे.
- सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु झाली आहेत.
- भुईमूग पिक शेंगा पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु झाली आहेत.
- कापूस पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी वेचणीची कामे सुरु आहेत.
- पुर्व हंगामी ऊस लागवडीची कामे सुरु आहेत.
- परतीच्या पावसामुळे काही ठिकाणी शेत पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असून पंचनाम्याची कामे सुरु झाली आहेत.

❖ **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, तुडतुडे किडींचा, तूर पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**

- विभागात रब्बी हंगामाच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.

## पुणे विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ११.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर (११२%) अंतिम पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- भात पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत.
- मका व बाजरी पिके पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- मूग, उडीद पिकांच्या काढणीची कामे पूर्ण झाली आहेत.
- तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- कापूस पिक बोंडे फुगणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे पुर्णत्वाकडे आहेत.
- भुईमूग पिक पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत.
- काही ठिकाणी परतीच्या पावसामुळे शेत पिकांचे नुकसान झाले आहे. पुर्वसूचना देण्याचे काम सुरु आहे.

❖ **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, तूर पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**

➢ विभागात रब्बी हंगामातील ज्वारी, मका, हरभरा व सुर्यफुल पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.

➢ तथापि परतीच्या पावसामुळे रब्बी हंगामातील पेरण्या खोळबल्या आहेत.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.६४ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ७.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) अंतिम पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

➢ भात पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी काढणीच्या अवस्थेत आहे.

➢ नाचणी पिक पोसणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.

➢ मका पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.

➢ तूर पिक फांद्या फुटणे ते फुलोरा अवस्थेत आहे.

➢ ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर काढणीची कामे सुरु आहेत.

➢ बाजरी पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.

➢ मूग, उडीद पिकांची काढणी पुर्ण झाली आहे.

➢ भुईमूग पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.

➢ सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.

➢ नवीन आडसाली ऊस फुटवे फुटणे ते कांडी सुटणेच्या अवस्थेत आहे.

➢ परतीच्या पावसामुळे काढणीस तयार असलेल्या पिकांचे नुकसान झाले असून नुकसानीची माहिती संकलित करण्यात येत आहे. पिकांच्या उत्पादनात घट येण्याची शक्याता आहे.

❖ **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी भात पिकावर खोडकिडीचा, कडा करपा रोगाचा, भुईमूग पिकावर हुमणीचा, ऊस पिकावर लोकरी मावा व हुमणी या किडींचा व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**

➢ विभागात रब्बी हंगामाच्या पेरण्यांना काही प्रमाणात सुरुवात झाली आहे. रब्बी ज्वारी, मका, गहू पिकांच्या पेरण्यांस सुरुवात झाली आहे.

## औरंगाबाद विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर २०.६८ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) अंतिम पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

➢ कापूस पिक बोंडे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

➢ मका पिक कणसांमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत.

➢ सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.

- मूग, उडीद पिके काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- बाजरी पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे पुर्णत्वाकडे आहेत.
- भुईमूग पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.
- परतीच्या पावसामुळे अतिवृष्टी होऊन काढणीस तयार असलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे.

- **किड व रोग :**
- विभागात काही ठिकाणी तूर पिकावर मर रोगाचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

- **रब्बी हंगाम : २०२२-२३**
- विभागात रब्बी हंगामाच्या पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत. काही ठिकाणी ज्वारी, हरभरा पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.

## लातूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर २७.६२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) अंतिम पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
- ज्वारी पिक पोटरी ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- मूग व उडीद पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.
- कापूस पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी वेचनीची कामे सुरु झाली आहेत.
- अतिवृष्टीमुळे शेत पिकांचे नुकसान झाले आहे. पिकांच्या उत्पादनात घट येण्याची शक्याता आहे.

- **किड व रोग :**
- विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर तुडतुडे किडींचा, तूर पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

- **रब्बी हंगाम : २०२२-२३**
- विभागात रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, मका, करडई व हरभरा पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
- तथापि मागील सप्ताहात परतीच्या पावसामुळे पेरणीच्या कामांना अडथळा निर्माण झाला आहे.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.७२ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ३१.१२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) अंतिम पेरणी झाली आहे.

- **पिक परिस्थिती :**

- ज्वारी, मका पिके पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.
- मूग व उडीद पिकांची काढणी पुर्ण झाली आहेत.
- भुईमूग, सोयाबीन, तीळ पिके पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- कापूस पिक बोंडे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी वेचणीस सुरुवात झाली आहे.
- ऑक्टोंबर मध्ये झालेल्या परतीच्या पावसामुळे काढणीस तयार असलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे पिकांच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे.

- **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी तूर पिकावर मर रोगाचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

- **रब्बी हंगाम : २०२२-२३**

- विभागात रब्बी हंगामाच्या पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान :** अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१३ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर १९.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) अंतिम पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**

- भात पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक बोंडे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी वेचणीस सुरुवात झाली आहे.
- तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक पक्वतेच्या अवस्थेत काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत.
- परतीच्या पावसामुळे काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे.

- **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिडीचा, तूर पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा, मर रोगाचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

- **रब्बी हंगाम : २०२२-२३**

- विभागात रब्बी हंगामाच्या पुर्वमशागतीची व पेरणीची कामे सुरु झाली आहेत.

## महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०२२-२३ मधील मुख्य पिकाखालील दि.२८/१०/२०२२ अखेरचा पिक पेरणी अहवाल

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागिल वर्षाची पेरणी क्षेत्र दि.२५.१०.२०२१ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | १७३६२८६ | १३७६०८ | १९८०८० | ११.४१ | १४४ |
| २ | गहू | १०८५०१२ | १८९ | २०७ | ०.०२ | ११० |
| ३ | मका | २६१५४२ | १४७३४ | २७१०७ | १०.३६ | १८४ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये (बाजरी,ओट,बार्ली,इतर) | ११८१७ | ६० | १५८ | १.३४ | २६३ |
| | **एकूण रब्बी. तृणधान्ये** | **३०९४६५६** | **१५२५९१** | **२२५५५२** | **७.२९** | **१४८** |
| ५ | हरभरा | २१५८२७० | ४२२० | १३१०७ | ०.६१ | ३११ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये (मूग,उडीद,मटकी,पोपटी, मसूर, इतर) | १२००९० | ३५९ | २४८ | ०.२१ | ६९ |
| | **एकूण रब्बी कडधान्ये** | **२२७८३६०** | **४५७९** | **१३३५५** | **०.५९** | **२९२** |
| | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५३७३०१६** | **१५७१७०** | **२३८९०७** | **४.४५** | **१५२** |
| ७ | करडई | २६६७५ | ३२९ | ११७७ | ४.४१ | ३५८ |
| ८ | जवस | १२११५ | ६ | ० | ०.०० | ० |
| ९ | तीळ | १४६७ | ० | ० | ०.०० | ० |
| १० | सुर्यफुल | ५०१५ | ४९ | २०५ | ४.१० | ४१९ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया (मोहरी, सरसों, भुईमूग,इतर) | १०८१३ | २९ | ३३ | ०.३० | ११३ |
| | **एकूण रब्बी तेलबीया** | **५६०८५** | **४१३** | **१४१६** | **२.५२** | **३४२** |
| | **राज्यातील एकूण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५४२९१०१** | **१५७५८३** | **२४०३२३** | **४.४३** | **१५३** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित